**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004, MAHARASHTRA**
PHONE :EPABX- 2609000, (Inquiry Cell) 2609143, (EST) 2609097, 98, 99
**FAX :0091-0231-2691533 & 0091-02312692333**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416 004 महाराष्ट्र
Estd: 1962
'A++ 'Re-accredited by NAAC
With grade point 3.52.
दूरध्वनी : (ईपीएबीएक्स) 2609000, (चौकशी कक्ष), 2609143 (विद्यार्थि विकास), 2609175, 2609176
फॅक्स : 0091–0231–691533 व 0091 – 0231–2692333
Email : dsw@unishivaji.ac.in
Dr. R. V. Gurav,
Director, Students' Development

जा. क्र. शिवाजी वि/विद्यार्थि विकास/ 351 दि. 07 JUL 2021

**प्रती,**

1) मा. प्राचार्य / संचालक / समन्वयक
   सर्व सलग्न महविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था,
   शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
2) मा. अधिविभाग प्रमुख / संचालक / समन्वयक,
   सर्व अधिविभाग,
   शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय : ऑनलाइन युवा महोत्सव २०२० – २०२१ बाबत.....

महोदय / महोदया

उपरोक्त विषय संदर्भात, या विभागामार्फत आयोजित जिल्हास्तरीय व मध्यवर्ती ऑनलाइन युवा महोत्सव २०२० – २०२१ दि. १२ ते १७ जुलै या कालावधीत संपन्न होत आहे. सदर युवा महोत्सव प्रथमच ऑनलाइन पद्धतीने होत आहे. त्यामुळे सदर युवा महोत्सव व्यवस्थित व सुरळीतपणे पार पडावा या अनुषंगाने विद्यार्थी, संघप्रमुख, यजमान विद्यालये व परीक्षक यांच्यासाठी मार्गदर्शक सूचना तयार केल्या आहेत. सदर सूचना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडल्या आहेत याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू
[signature]
संचालक
विद्यार्थी विकास विभाग

सोबत : वरील प्रमाणे

D:d drive:Letters/Letter

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## विद्यार्थी विकास विभाग

## ४० वा युवा महोत्सव (**Online**)

### स्पर्धक विद्यार्थ्यांना सुचना

1. आपली तब्बेत (आरोग्य) व्यवस्थित असल्याची खात्री करुन घ्यावी. तब्बेत ठीक नसेल तर सादरीकरणाचा विपरीत परीणाम आपल्या आरोग्यावर होणार नाही याची काळजी घ्यावी.
2. सादरीकरणासाठी आवश्यक असणारी internet connectivity पूर्णवेळ व्यवस्थित असेल याची खात्री करुन घ्यावी.
3. दिलेल्या वेळेपूर्वी कमीत कमी १५ मिनिटे उपस्थिती असावी.
4. online meeting ला join झाल्या झाल्या आपल्या नावात बदल ( rename yourself ) करुन सादरीकरणासाठी आपल्याला दिलेल्या महाविद्यालय कोड क्रमांकाची नोंद करावी.
5. आपल्या सादरीकरणापूर्वी आणि सादरीकरणानंतर आपला माईक व व्हिडीओ बंद ठेवावा. फक्त आपल्या सादरीकरणावेळीच माईक व व्हिडीओ सुरु ठेवावा.
6. सादरीकरणासाठी आपण आपल्या सोयीनुसार योग्य जागेची निवड करावी. त्याठिकाणी सादरीकरणाचा सराव करुन घ्यावा. सादरीकरणामध्ये इतर गोष्टींचा व्यत्यय येणार नाही अशी स्वच्छ, निट नेटकी, शांत जागा निवडावी.
7. आपला पोषाख व्यवस्थित असावा. तसेच कॅमे—यासमोर आपली हालचाल आवश्यक तेवढीच असावी. आवश्यक वाटल्यास Virtual Background चा वापर करावा.
8. एकदा metting join केल्यावर इतर कामे शक्यतो करु नयेत.
9. सादरीकरणासाठी शक्यतो Laptop / Desk top वापरावा. अशावेळी आपला फोन शक्यतो दूर ठेवावा.
10. सादरीकरणासाठी आवश्यकतेनुसार Headphone चा वापर करावा.
11. सादरीकरणासाठी कॅमे—याचा Wide-angle set-up करावा. कॅमे—याची जागा निश्चित ( Fix ) असावी.
12. आवश्यकतेनुसार ध्वनी/प्रकाश यंत्रणा तयार असावी. तसेच नेपथ्य योजना आवश्यक असेल तरच करावी.
13. कला विभागातील (Fine arts) सर्व स्पर्धांसाठी Top angle ने कॅमेरा set-up करणे. जेणेकरुन स्पर्धक विद्यार्थ्यांसह कला निर्मिती करताना परीक्षक देखरेख करुन नोंद घेवू शकतील.
14. सादरीकरणासाठी साथिदार वापरणार असाल तर त्यांची माईक व्यवस्था आधीच तपासून व्यवस्थित (Set) करुन घेणे.
15. सादरीकरणापूर्वी आपला क्रमांक पुकारल्यानंतर स्पर्धक विद्यार्थ्यांने आपले ओळखपत्र/प्रवेश पावती स्पष्ट दिसेल अशा पद्धतीने कॅमे—यासमोर दाखवावे.
16. सर्वच स्पर्धांचे आणि सादरकरणांचे व्हिडीओ रेकॉर्डिंग होणार आहे. त्यामुळे स्पर्धेमध्ये कोणताही गैरप्रकार अथवा प्रमाद होणार नाही याची काळजी स्पर्धक विद्यार्थ्यांनी घ्यावी.
17. बेकायदेशीर नोंदणी,प्रवेश व सादरीकणाबाबत काही तक्रार उद्‌भवल्यास संबंधित विद्यार्थी, संघप्रमुख तसेच महाविद्यालयास जबाबदार धरले जाईल. व त्यांच्यावर विद्यापीठ नियमानुसार कारवाई केली जाईल.
18. सादरीकरणादरम्यान काही अडचण आल्यास विद्यार्थ्यांनी घाबरुन जाऊ नये. संघप्रमुखांच्या व आयोजकांच्या संपर्कात रहावे.
19. विद्यार्थ्यांना दिलेली लिंक इतरांना शेअर करु नये. इतरांनी युटयूब लिंक चा वापर करावा.
20. Fine Arts च्या कलाप्रकारामध्ये सहभागी स्पर्धकांनी आपली कलाकृती पूर्ण झाल्यावर कोडनंबरसह संपूर्ण कलाकृती दिसेल अशा पद्धतीने कॅमे—याची व्यवस्था करावी. त्यानंतर कोडनंबरसह संपूर्ण कलाकृतीचा एकच चांगला फोटो आपणाला दिलेल्या ईमेलवर आयोजक महाविद्यालयाकडे पाठवावा.

संचालक,
विद्यार्थी विकास

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विद्यार्थी विकास विभाग

४० वा युवा महोत्सव (**Online**)

## यजमान महाविद्यालयांना सुचना

The hosts and organizers are expected to adhere to the following meeting etiquettes while conducting the Youth Festival this year that is to be conducted virtually in wake of COVID 19

1. Test your Set-Up: Make sure you have good internet connectivity to ensure smooth conduct of the program
2. Inform the participants well in the advance about the program being recorded.
3. Appoint two-three co-hosts to help the program be conducted seamlessly.
4. Under security setting mute all the participants on entry, keep the participants video off by default and most importantly turn off the annotation.
5. Start the meeting early minimum 20 minutes prior to the scheduled time to ensure program scheduled is followed.
6. Use a virtual background to avoid your surroundings being displayed Keep it neat and tidy.
7. Don't multitask or snack in between.
8. Be dressed appropriately.
9. Give clear instructions to the participants.
10. Summarize the program before you end.
11. Give the college email to the examiners.
12. For the fine arts events get the photographs from the participants and send it to the concerned examiners for final assessment. Store these photographs properly in the Separate folders.
13. Collect the individual mark sheet from each examiner, cumulative mark sheet from the examiner to whom the format of it was given, and the final result of each of the event.
14. Send the final result to the Director, Students' Development, Shivaji University Kolhapur on ***dsw@unishivaji.ac.in*** The result should be authenticated by the seal and signature of the participate of the organizing college.

Director

Students' Development

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

विद्यार्थी विकास विभाग

४० वा युवा महोत्सव (**Online**)

## संघप्रमुखांना सुचना

1. संघप्रमुखांनी आपल्या महाविद्यालयाच्या स्पर्धक विद्यार्थ्यांच्या सतत संपर्कात रहावे.
2. आपल्या महाविद्यालयाच्या स्पर्धकांची नोंदणी ही नियमानुसार आहे याची खात्री करुन घ्यावी. बेकायदेशीर नोंदणी, प्रवेश किंवा सादरीकरणाबाबत संबंधित विद्यार्थी, संघप्रमुख तसेच महाविद्यालयास जबाबदार धरले जाईल.
3. आपले स्पर्धक दिलेल्या लिंकवर वेळेआधी सहभागी होतील याची काळजी घ्यावी.
4. स्पर्धेपूर्वी विद्यार्थ्यांची **online metting** घेवून पूर्वसूचना घ्याव्यात. तसेच त्यांच्या अडचणी समजून घेवून योग्य त्या उपाययोजना कराव्यात.
5. स्पर्धेच्या वेळी आपणही आवश्यकतेनुसार दिलेल्या लिंकवर सहभागी व्हावे. स्पर्धेची लिंक इतरांना शेअर करु नये. आवश्यक वाटल्यास युटयूब लिंक शेअर करावी.
6. स्पर्धा सुरु असताना आपल्याकडून कोणत्याही प्रकारचा अडथळा येऊ नये याची काळजी घ्यावी. आवश्यकता भासल्यास संयोजकांशी whatsapp/फोनवर संपर्क साधावा.
7. स्पर्धेच्या वेळी आपण online उपस्थित राहणार असाल तर आपला पोषाख व्यवस्थित असावा. आपल्या उपस्थितीच्या वेळी आपला माईक बंद असावा. व्हिडिओ शक्यतो सुरु करु नये. एकाच वेळी अनेक कामे करणे टाळावे.

संचालक

विद्यार्थी विकास

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## विद्यार्थी विकास विभाग
## ४० वा युवा महोत्सव (Online)

### परीक्षकांना सुचना

1. परीक्षकांनी प्रत्येक सादरीकरणाचे मुल्यमापन स्वतःच्या सदसद्विवेक बुध्दिने करावयाचे आहे. परीक्षकांच्या मुल्यमापनामध्ये इतर कुणीही ढवळाढवळ करणार नाही. तसे जाणवल्यास परीक्षकांनी अशी बाब युवा महोत्सव समितीच्या किंवा संचालक, विद्यार्थी विकास यांच्या निदर्शनास आणावी.
2. प्रत्येक परीक्षकाने प्रत्येक सादरीकरणाचे वस्तुनिष्ठ बारकावे (सकारात्मक/नकारात्मक) कोड नंबरनुसार स्वतंत्रपणे नोंद करुन ठेवावेत. या नोंदी बंद लखोटयातून स्वतःच्या सहीनिशी विद्यार्थी विकास विभागाकडे जमा कराव्यात.
3. संबंधित स्पर्धेच्या निकालाबाबत काही तक्रार झाल्यास किंवा वाद उद्भवल्यास सदरच्या नोंदी सह आपले मत युवामहोत्सव समिती/मा. कुलगुरु यांचे समोर सादर केले जाईल. त्यामुळे सदर स्पर्धेच्या (संबंधित कलाप्रकाराच्यां) निकालाची संपूर्ण जबाबदारी ही परीक्षकांची राहील.
4. प्रत्येक परीक्षकाने दिलेल्या नमुन्यानुसार स्वतंत्रपणे गुणपत्रक तयार करावयाचे आहे. तीन परिक्षकांपैकी एका परिक्षकांकडे एकत्रित गुणपत्रक व निकालपत्रकाचा नमुना दिला जाईल. त्याप्रमाणे वैयक्तिक गुणपत्रक, एकत्रित गुणपत्रक व निकालपत्रक यजमान महाविद्यालयाकडे पाठवण्याचे आहे.
5. Fine arts कलाप्रकारामधील कोणत्याही कलाप्रकाराची वेळ संपल्यानंतर कोड नंबरसह संपूर्ण कलाकृतीचे निरीक्षण करावे. तसेच त्यानंतर संबंधित स्पर्धकाने काढलेला फोटो आपल्या ईमेलवर पाठवला जाईल आवश्यकता वाटल्यास सर्व स्पर्धकांच्या फोटोंचे अवलोकन गुणांकन करण्यापूर्वी करावे.
6. निकालपत्रक तयार करताना **जिल्हास्तरीय युवा महोत्सव मधून प्रत्येक कलाप्रकारातून फक्त प्रथम, व्दितीय व तृतीय (फक्त तीनच) क्रमांक दयावयाचे आहेत.** दोन किंवा अधिक स्पर्धकांचे समान गुण झाल्यास तीनही परीक्षकांनी चर्चा करुन, सरस/निरस सादरीकरणाचा विचार करुन गुण निश्चित करावेत. पण कोणत्याही परीस्थितीत तीनच क्रमांक देणेत यावेत.
7. **मध्यवर्ती युवा महोत्सवाचे** निकालपत्रक तयार करतानाही फक्त तीनच क्रमांक देण्यात यावेत. तथापि परिक्षकांना वाटल्यास उत्तेजनार्थ क्रमांक दिला तरी चालेल.
8. या वर्षी प्रथमच ऑनलाईन पद्धतीने युवा महोत्सव आयोजित केला आहे. त्यामुळे परीक्षकांनी खालील बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.
   - **i.** सादरीकरणाच्या वेळेच्या बाबतीत तसेच इतर नियमांच्या बाबतीत काटेकोर रहावे. तथापि स्पर्धक विद्यार्थ्याला सादरीकरण करताना अडचण येत असल्यास त्याचा सहानभूतीपूर्वक विचार करावा.
   - **ii.** आवश्यकता भासल्यास पुर्नसादरीकरणाची संधी दयावी.
   - **iii.** सादरीकरणा दरम्यान साथीदार किंवा प्रकाश योजना, नेपथ्य इ. सारख्या इतर बाबींना मूल्यमापनामध्ये कमी महत्व दयावे.
   - **iv.** सर्वच परिक्षकांनी संपूर्ण सादरीकरणाकडे पूर्णवेळ लक्ष दयावे. सादरीकरण सुरु असताना इतर गोष्टी /कामे करु नयेत. कला प्रकारांसाठी **(Fine Arts)** सुद्धा परीक्षक पूर्ण वेळ Online असणे आवश्यक आहे.
   - **v.** **Benefit of Doubt** हा स्पर्धक विद्यार्थ्यांसाठी असावा.
   - **vi.** स्पर्धक विद्यार्थ्यांचे एकाच वेळी दोन ठिकाणी सादरीकरण आले असेल तर त्यांना त्याच्या सोयीने (सुरुवातीला, मध्ये किंवा शेवटी) सादरीकरणाची संधी द्यावी.
   - **vii.** परिक्षकांनी स्पर्धेच्या वेळी आवश्यक पोषाख परिधान केलेला असावा.

संचालक,
विद्यार्थी विकास